MHKO050007972023

**नि.२२ वरील आदेश**
**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.४३५/२०२३**
**ओंकार पुजारी विरुध्द सुरज मेस्त्री**

सदरचे प्रकरण हे कलम १३८ एन.आय. अॅक्ट प्रमाणे फिर्यादीने दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात नि.२२ वरील अर्ज आरोपीने दाखल केला असून त्याद्वारे आरोपी यांना पुरावा देणेस परवानगी देणेत यावी अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जावर फिर्यादी यांनी म्हणणे दाखल केले की, अर्जातील मजकुर खरा व बरोबर नाही. सदर अर्जातील कथन खोटे व लबाडीचे आहे. सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी फिर्यादीने विनंती केली आहे.

३. आरोपीतर्फे नि.२६ वर लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. फिर्यादी यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ***T. Nagappa Vs. Y. R. Muralidhar reported in AIR 2008 SUPREME COURT 2010*** या न्यायनिर्णयावर आपली भिस्त ठेवली. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. सदर न्यायनिर्णयामध्ये पारित केलेले निर्देश हे सदर अर्जास लागू होत आहेत.

४. सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता तसेच नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन आरोपी यांना पुरावा देणेची संधी देणे न्यायोचित होईल. करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे -

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करणेत येतो.

२. आरोपीने नियमाप्रमाणे पुरावा देणेकरिता योग्य त्या स्टेप्स घ्याव्यात.

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2024.08.08 17:58:18 +0530

ठिकाण:- इचलकरंजी.
दिनांक:-०८/०८/२०२४

(एम.एम.चौधरी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.३, इचलकरंजी.